■ वर्ष- ११ ■ अंक- ४१ ■ मुंबई, मंगळवार, २६ ऑगस्ट ते ०१ सप्टेंबर २०२५ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

नारळाच्या पाण्याच या गोष्टी मिसळून प्या

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

3 → न्यायालयात कुत्रे जिंकले, सर्वसामान्य माणूस हरला

ह्यातीन वर्षे मुदतवाढ देण्याचा महारेराला अधिकार नाहीह्न; अपीलेट प्राधिकरणाचा ← 4

थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र 2024 - जनजागृती उपक्रम



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

आज दिनांक २५/०८/२०२५ रोजी आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्ट च्या वतीने मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर रावसाहेब थोरात कला व वाणिज्य महाविद्यालय, वणी येथे मुक्त महाराष्ट्र 2024 या महत्वाकांक्षी उपक्रमाच्या अंतर्गत थॅलेसिमिया व ॲनिमिया विषयक जनजागृती कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

कार्यक्रमात प्रो. पांगम सरांनी थॅलेसिमिया व ॲनिमिया याबद्दल सखोल माहिती दिली. थॅलेसिमिया आजार काय असतो, ॲनिमियाची कारणे व परिणाम काय आहेत याचे सोप्या भाषेत स्पष्टीकरण करून विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली. विद्यार्थिनींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसनही करण्यात आले. या उपक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे (M.Sc., Ph.D.) यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टचे आरोग्य विभाग सचिव प्रोफेसर प्रकाश पांगम, संस्थापक संयुक्त सचिव गुरुप्रसाद दीपक नाईक, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. रवींद्र चव्हाण (Ph.D. in Physician Education), व्यासपीठावर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. वाय. एम. साळुंखे, प्राध्यापक नितीन बोरसे, उमेश देशमुख, तसेच डॉ. जे. डी. पवार आणि श्री. बी. टी. ठाकरे उपस्थित होते.या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये रक्तविकारांविषयी जागरूकता वाढली असून आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. पुढील टप्प्यात विद्यार्थ्यांची रक्त तपासणी करून आवश्यक ते पुढील उपाय आणि उपचाराची दिशा निश्चित केली जाणार आहे.या उपक्रमाचा उद्देश प्रथम जनजागृती - नंतर तपासणी - आणि मग उपचार या संकल्पनेवर आधारित आहे. हाच कार्यक्रम लवकरच मराठा विद्या प्रसारक समाजाच्या सर्व महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणार आहे. हा प्रयत्न थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र 2024 या मोठ्या स्वप्नाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.



गणेशोत्सवात फुलांचा तुटवडा ! प्रति किलो १६० ते २०० रुपये दर अपेक्षित

मुंबई

राज्यात मागील काही दिवस कोसळलेल्या मुसळधार पावसाचा फुलांच्या शेतीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला आहे. त्यामुळे दादर, नवी मुंबईसह ठाणे येथील प्रमुख फुलबाजारांत फुलांची आवक कमी झाली आहे. आवक कमी झाल्यामुळे बाजारपेठांमध्ये फुलांचा तुटवडा निर्माण झाला आहे. दरम्यान, मागील दोन दिवस दादर फुलबाजारात झेंडूची आवक अगदीच कमी झाली आहे. ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर फुलांची आवक घडल्यामुळे बाजारपेठांमध्ये चिंतेचा सूर दिसत आहे. याआधी साधारण प्रति किलो ८० ते १०० रुपये दराने फुलांची विक्री होत होती. मात्र, पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतांमध्ये पाणी साचल्याने झेंडू, मोगरा, गुलाब, चाफा यांसारख्या फुलांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. परिणामी,



गणेशोत्सवाच्या काळात फुलांची मागणी वाढणार असली तरी आवक मात्र कमी राहील, असा अंदाज फुल विक्रेत्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे गणपतीत साधारण झेंडूचा प्रति किलो १६० ते २०० रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, गणपतीत आरास आणि सजावटीसाठी मोठ्या प्रमाणात फुलांचा वापर होतो. घरगुती गणपतीसोबतच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या सजावटीसाठी झेंडू आणि इतर फुलांना मोठी मागणी असते. त्यामुळे भाव आणखी वाढण्याची शक्यता असून ग्राहकांना फुलांसाठी अधिक रक्कम खर्च करावी लागणार आहे, असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. याचबरोबर दरवर्षी गणेशोत्सवाच्या आधी शेतकऱ्यांकडून बाजारात मोठ्या प्रमाणात फुलांची आवक होत असते. मात्र यंदा पावसामुळे परिस्थिती वेगळी असून विक्रेत्यांना फुलांचा तुटवडा भासणार आहे, असे फुल विक्रेते महेंद्र यादव यांनी सांगितले.

गतवर्षी याच कालावधीत झेंडू प्रति किलो ८० ते १०० रुपये दराने विकला जात होता. तर गुलाब, मोग[]याचे दरही यंदापेक्षा ३० ते ४० टक्क्यांनी कमी होते. मात्र यंदा ऐन गणेशोत्सवाच्या कालावधीत फुलांना पावसाचा थेट फटका बसल्याने भाव दुप्पट होणार आहेत. गेल्या वर्षी गणेशोत्सवात दादर फुलबाजारात रोज साधारण ३५० ते ४०० टन फुलांची आवक होत होती, यंदा इतकी होईल की नाही शंका आहे, असे फुल विक्रेत्यांनी सांगितले.

इतर फुलांचे भाव चढेच

झेंडूव्यतिरिक्त रंगिबेरंगी गुलाब, चाफा, मोगरा आदी फुलांचे दर येत्या दिवसांत वाढण्याची शक्यता आहे. सध्या चाफ्याची पाच फुले २० रुपयांना मिळत आहेत. पावसाचे प्रमाण असेच राहिले तर किंमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. लाल, केशरी, सफेद, गुलाबी रंगाच्या सहा गुलाबांची जुडी ८० ते ९० रुपये दराने विकण्यात येत होती. काही दिवसांनी त्यात ५० रुपयांनी वाढ होण्याची शक्यता आहे.

मुंबई रेल्वे पोलिसांची हद्द आता कोकणापर्यंत



मुंबई, कोकण रेल्वेवरील स्थानकांची जबाबदारी रेल्वे पोलिसांवर सोपवण्यात आली आहे. त्यामुळे कोकण रेल्वेवरील प्रवाशांच्या सुरक्षेत भर पडणार आहे. येत्या काही दिवसांत कोकण रेल्वेच्या रत्नागिरी रेल्वे स्थानकात रत्नागिरी रेल्वे पोलीस ठाण्याचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या रेल्वे पोलीस ठाण्यात सध्या तीन ते चार पोलीस अधिकारी आणि ६० पोलीस कर्मचारी असतील. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या प्रवाशांच्या सुरक्षेची, प्रवाशांच्या मालाची आणि रेल्वेच्या मालमत्तेची सुरक्षा करण्याची जबाबदारी रेल्वे सुरक्षा दलाकडे (आरपीएफ) आहे. तसेच, रेल्वे स्थानके, रेल्वे परिसर, उपनगरीय मार्गावरील गुन्ह्यांचा तपास, गुन्ह्यांची उकल करण्याची जबाबदारी रेल्वे पोलिसांकडे आहे. मध्य रेल्वेवरील सीएसएमटी ते पनवेल, कसारा, खोपोली आणि पश्चिम रेल्वेवरील चर्चगेट ते डहाणू रोडपर्यंतची हद्द ही मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाकडे आहे. तर, रोह्यानंतर कोकणातील रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची, रेल्वे परिसराच्या सुरक्षेची जबाबदारी रेल्वे सुरक्षा दल आणि स्थानिक पोलीस ठाण्याची आहे, परंतु गेल्या काही वर्षांत कोकण रेल्वे मार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या प्रचंड वाढली आहे. मोबाइल चोरी, सोनसाखळी खेचणे, मारामारी, खून अशा घटना वाढल्याने या ठिकाणी रेल्वे पोलीस ठाण्याची उभारणी करणे अत्यावश्यक होते. यासह कोकण रेल्वे प्रवासात महिलांशी संबंधित गुन्हे घडत असल्याने, तत्काळ गुन्हा नोंद करून, तपास करणे गरजेचे असते. परंतु, कोकण रेल्वे हद्दीत गुन्हा घडल्यास, त्याची तक्रार स्थानिक पोलीस ठाण्यात करावी लागत होती. त्यामुळे कोकण रेल्वेवरील कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाकडे दिली आहे. याबाबत शासनाकडून मान्यता मिळाली असून, आता रत्नागिरी रेल्वे स्थानकावर लोहमार्ग पोलीस ठाणे उभारण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाशांना त्वरित तक्रार करणे सोयीस्कर होईल.

रत्नागिरी रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोलाड ते राजापूर रेल्वे स्थानकाचा भाग असेल. तसेच, प्रत्येक स्थानकाच्या रेल्वे परिसराचाच भाग हद्दीत समाविष्ट केला आहे. त्यानंतर कोकण रेल्वेच्या स्थानकातील दोन्ही बाजूने ४०० ते ५०० मीटरचा भाग सोडल्यास उर्वरित भाग हा स्थानिक पोलीस ठाण्याच्या हद्दीतच राहणार आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने दिली. येत्या काही दिवसांत रत्नागिरी लोहमार्ग पोलीस ठाणे कार्यान्वित केले जाईल. या पोलीस ठाण्याची हद्द ही रायगडमधील कोलाड रेल्वे स्थानक ते विन्हेरे रेल्वे स्थानक आणि रत्नागिरीमधील दिवाणखवटी रेल्वे स्थानक ते राजापूर रेल्वे स्थानकापर्यंत आहे. या ठाण्यात सुमारे १५० रेल्वे पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा ताफा कार्यरत राहणार आहे, अशी माहिती लोहमार्ग पोलीस आयुक्त एम. राकेश कलासागर यांनी दिली.

गणपतीला गावी जाण्यासाठी कोकणवासीयांचा एसटीला प्रचंड प्रतिसाद

मुंबई

येत्या २७ ऑगस्ट रोजी गणरायाचे आगमन होत असून गणपतीच्या स्वागतासाठी मुंबई, ठाणे व पालघर विभागातून कोकणात मूळगावी जाणाऱ्या कोकणवासीयांनी एसटी प्रवासाला पसंती दर्शवली आहे. त्यामुळे एसटीच्या ४,४७९ बस गट आरक्षणासह एकूण ५,१०३ जादा बस आतापर्यंत भरल्या आहेत. मुंबईतील कोणवासियांचा अत्यंत जिव्हाळ्याच्या असलेल्या गणपती उत्सवासाठी एसटी महामंडळाने यावर्षी २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान ५,२०० जादा एसटी बस सोडण्याचा निर्णय घेतला. व्यक्तिगत आरक्षणाबरोबरच गट आरक्षणामध्ये अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेंतर्गत ७५ वर्षांवरील प्रवाशांना १०० टक्के, ज्येष्ठ नागरिकांना व महिलांना ५० टक्के तिकिट दरात सवलत दिली आहे. २३ ऑगस्टपासून मुंबई, ठाणे, पालघर या विभागांतील प्रमुख बस स्थानकातून या जादा बस सोडण्यात येणार आहेत.

कोकणवासियांचा प्रवास होणार सुखरूप गणपती, मुंबईचे कोकणवासीय आणि एसटी यांचे एक अतूट नाते आहे. मुंबईतून कोकणात थेट मूळगावी अगदी वाडी-वस्तीपर्यंत फक्त एसटीच कोकणवासीयांना सुखरूप पोहोचवते. त्यामुळे दरवर्षी गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या मुंबईकर कोकणवासीयांच्या सेवेसाठी एसटी धावत असते, अशी प्रतिक्रिया परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. प्रवास सुकर होण्यासाठी विविध उपाययोजना गणेश भक्तांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या काळात एसटीची वाहतूक सुरळीत होण्यासाठी बस स्थानक व बस थांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. तसेच कोकणातील महामार्गावर ठिकठिकाणी वाहन दुरुस्ती



पथक देखील तैनात करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर प्रवाशांना नैसर्गिक विधीसाठी तात्पुरत्या स्वरूपाची प्रसाधानगृहे उभारण्यात येणार आहेत, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

एसटीला १३ ते १६ कोटी रुपयांचा तोटा

गणपती विशेष जादा बस चालवण्यासाठी राज्यातील इतर विभागातून बस मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे येथील विभागात पाठवण्यात येतात. त्यानंतर या बसचे गट आरक्षण झाल्यानंतर, त्या परतीचा प्रवास करताना रिकाम्या येत होत्या. त्यामुळे महामंडळाचा इंधनावर जादा खर्च होत होता. यातून मार्ग काढण्यासाठी परतीच्या प्रवासासाठी ३० टक्के जादा भाडेवाढ केली होती, मात्र या निर्णयाबाबत प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली. तसेच, निर्णय मागे घेण्याची मागणी केली. त्यानंतर गौरी-गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या एकेरी गट आरक्षणावरील ३० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय मागे घेण्यात आला. एकेरी गट आरक्षणावरील ३० टक्के भाडेवाढ रद्द केल्याने, एसटीला १३ ते १६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागण्याची शक्यता आहे.ण रेल्वेवरील स्थानकांची जबाबदारी रेल्वे पोलिसांवर सोपवण्यात

वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

सँडविचमध्ये लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?

चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक



त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर : लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

त्वचेसाठी वरदान आहे कांदा : कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

कसा करावा वापर : तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

बाजारात मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.

साहित्य : एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

कृती : बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.



'ब्लॅक टी'चे असेही फायदे

ब्लॅक टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणारी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते. टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते. चहात ॲण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.

ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.



अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा; असे ठेवा नियंत्रण

दररोज पुढे जाण्याच्या शर्यतीत प्रत्येक व्यक्ती धकाधकीचं आयुष्य जगत आहे. लवकर पुढे जात लवकर यश मिळवण्याच्या नादात अनेक जण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. सोपं, लवकर आणि जिभेच्या चवी पुरवण्यासाठी अनेक जण फास्ट फूडच्या आहारी गेले आहेत. या फास्ट फूडमुळेच अनेक जण लठ्ठपणाचे शिकार होत आहेत. अशाप्रकारे आलेला लठ्ठपणा कमी करणं तितकंसं सोपं नाही. लठ्ठपणामुळेच शरीरात अनेक प्रकारचे विकार बळावतात. अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा असून शरीरातील लठ्ठपणामुळेच अनेक आजारांना निमंत्रण दिले जाते.



लठ्ठपणाचे निदान व्यक्तीच्या शारीरिक तपासणी आणि त्याच्या इतिहासावर अवलंबून आहे. लठ्ठपणामुळे आलेल्या रोगांची शक्यता तपासण्यासाठी व्यक्तीच्या 'बीएमआय' बॉडी मास इंडेक्सचे मापन केले जाते. आई-वडिलांपैकी एकाला लठ्ठपणा असल्यास मुलांमध्येही लठ्ठपणा होण्याची शक्यता असते. कॅलरीयुक्त आहार, जंक, फास्ट फूड, पेय पदार्थांचे अधिक सेवन यामुळे लठ्ठपणाची समस्या निर्माण होण्यास सुरुवात होते. फळं, भाज्या यांच्या कमी सेवनानेही व्यक्ती लठ्ठपणाचा शिकार होऊ शकतात. लठ्ठपणामुळे स्ट्रोक, कॅन्सर, प्रजनन क्षमता कमी होणे, ऑस्ट्रियोआर्थराइटिस, टाइप २ डायबिटीज, पित्ताशयाचे आजार, उच्च रक्तदाब, लिवरला सूज येणे, श्वास घेण्यास अडथळा, नर्व डिस्ऑर्डर यासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. यासारखे आजार बळावू नये यासाठी नियमित व्यायामाने वजन नियंत्रणात ठेवू शकता. जोरात चालणे, पोहणे, सायकल चालवणे यासारखे व्यायाम करू शकता. दिवसांतून तीन वेळा नियमित आहार घ्या. काही लोक भूक लागण्यावर कोणत्याही वेळी खातात. वेळ न पाहता गोड पदार्थ आणि फास्ट फूड खातात. त्यामुळे लठ्ठपणा वाढीस लागतो. कमी कॅलरीयुक्त आहार, फळं, भाज्या, कडधान्यांचे सेवन करा. मिठाई, अल्कोहलचे सेवन अगदी कमी प्रमाणात करा. अतिरिक्त चरबी वाढवणारे पदार्थ खाण्यापासून लांब राहा. दिवसभरात आवश्यक तेवढे पाणी प्या. काकडी, लिंबू, आलं, पुदिन्याचा रस वजन कमी करण्यास मदत करतात. विशेषतः पोटातील फॅट कमी करण्यास या फळांचा रस फायदेशीर ठरतो. फॅट कमी करण्यासाठी ग्रीन टी, दही, डाळी, ओट्स, अंडी अशा पदार्थांचे सेवनही लाभदायक ठरते.

वारंवार तोंड येत असल्यास आजमावा हे उपाय

पचनक्रिया व्यवस्थित नसेल, किंवा शरीरामध्ये काही कारणाने उष्णता वाढली असेल, तर वारंवार तोंड येऊ लागते. यालाच 'माऊथ अल्सर्स' असेही म्हटले जाते. अनेकदा काही कारणासाठी घेतलेली औषधे उष्ण पडल्यानेही तोंड येऊ शकते. तोंड आले असता काही खाणे-पिणे कठीण होऊन बसते. जिभेवर बारीक फोड येतात आणि क्वचित वेदनाही होतात. बहुतेक वेळी बी कॉम्प्लेक्स घेतल्याने माऊथ अल्सर्स थोड्याच अवधीत बरे होतात. त्याच्या जोडीने काही घरगुती उपायांचा अवलंब करूनही हे माऊथ अल्सर्स बरे करता येऊ शकतात.

तुळस स्वास्थ्यवर्धक असून, यामध्ये वेदनाशमक गुण आहेत. तसेच शरीरातील उष्णता कमी करण्यासही तुळस सहाय्यक आहे. तोंड आले असता दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीची पाने चावून खाल्ल्याने आराम मिळतो. जर पचनक्रिया सुरळीत नसल्याने शरीरातील उष्णता वाढून तोंड आले असले, तर ते बरे करण्यासाठी खसखस उपयुक्त ठरते. थोडी खसखस चावून खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन तोंडातील अल्सर्स लवकर निवळतात.

नारळाचे तेल आणि नारळाचे पाणी हे दोन्ही तोंडातील अल्सर ठीक करण्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. नारळाच्या पाण्याने शरीरातील उष्णता दूर होत असून, नारळाचे तेल तोंडात धरून चूळ भरल्याप्रमाणे खुळखुळविल्यानेही तोंडातील अल्सर ठीक होण्यास मदत होते. याला 'ऑईल पुलिंग' म्हटले जाते. जिथे अल्सर आहेत त्यावरून नारळाचा चव लावल्यानेही तोंडातील अल्सर बरे होतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ मधाच्या पुडीमध्ये थोडासा मध घालून तोंडामध्ये आणि जिभेवर लावल्यास अल्सर ठीक होतात.



वसई विरार शहर महानगरपालिका
प्रभाग समिती " एफ " धनिव/पेल्हार
ता.वसई, जि. पालघर ४०१२०८

ईमेल - pelharbvvcmc@gmail.com
जावक क्र.:वविशम/प्रसएफ/कर.वि./२४८९/२०२५-२६
दिनांक २५/०८/२०२५

जाहिर नोटीस

वसई विरार शहर महानगरपालिका सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ७ (सात) दिवसांचे आत लेखी स्वरुपात हरकत / तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

अ. क्र.	विभाग	नविन मा. क्र.		ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजेच विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
		वॉर्ड क्र.	मा. क्र.		
१	धानिव	४	५१९८	सुजाता रविकांत काळे	मीना राजेश शर्मा
२	धानिव	३	८०६/६	शांती देवी वीजय कुमार यादव	रीना यादव
३	धानिव	५	१४७८/२९	यासमीन अखील शेख	अली हुसैन s /o रियाजुल्लाह
४	धानिव	३	६५८/४	शहरुनिसा अब्दुल हमीद शाह	मनोज राजेंदर सिंह
५	धानिव	१	५६७७/१	अब्दुल करीम चौधरी व मोहम्मद हसन	सत्यम कुमार विजय कुमार विश्वकर्मा
६	धानिव	४	३५५३/१	सोबत अली वलीवक्ष शाह	अब्दुल रऊफ s/o मो रफीक
७	धानिव	४	२९१८/१	लालजी रामखेलावन यादव	संगीता प्रदीप कुमार यादव
८	धानिव	२	५५८२	खान शाहील फिरोज खान व शमानिशार	शीला शर्मा
९	धानिव	२	६५२	सुर्यनाथ हीरालाल यादव	वाहीदा मोहम्मद सलीम कुरेशी
१०	धानिव	१	२६१२/४	प्रमोद रामजीत सिंह	महेक जाकीर हुसैन अंसारी
११	धानिव	१	२७७१/१४	ताहेरा बानो मोहम्मद रजा कुरेशी	मोइनुददीन मोहम्मद उमर कुरेशी
१२	धानिव	४	८५/२	कुसुम मोहीते	डॉमनीक फरगोस
१३	धानिव	२	१२९६	गोरखनाथ रामवेलास यादव	आरती मदन विश्वकर्मा व मदन रामपलट विश्वकर्मा
१४	धानिव	३	५०९/३	नजमा मुन्नी अमीत गाझी	ईदुल निशा जाबीर शेख
१५	धानिव	२	५८४१	रमजान गुलाम मुस्तफा शेख	नर्गिस सिराज शेख
१६	धानिव	३	२९५	सिंह अरुणकुमार सिंह प्रतीमा अरुणकुमार	हेमाराज हरजीराम चौधरी
१७	धानिव	२	५६३८	राजेश कुमार नन्हेराम शर्मा	सचिदानंद रामकृपाल दुबे
१८	धानिव	१	११५३	मोहम्मद असारुल शेख	मो अफरोज आलम नो शनीफ
१९	धानिव	३	४३६/११	हरेद्रकुमार इनउ यादव	रामचंद्र नंदलाल बेनवंशी
२०	धानिव	१	२७८६/२५	लता चंद्रकांत जोशी	अरविंद कुमार जवाला प्रसाद वर्मा
२१	धानिव	५	२०२२/२	बबलु प्रल्हाद सोनी	मोहम्मद इरफान मो दावद शेख

(XXXXXXX)
सहा. आयुक्त
प्रभाग समिती "एफ "धानीव/पेल्हार
वसई विरार शहर महानगरपालीका

संपादकीय

न्यायालयात कुत्रे जिंकले, सर्वसामान्य माणूस हरला



संपादक दिपक मोरेश्वर नाईक





धार्मिक परंपरा अन भूतदयेच्या नावाखाली भटक्या प्राणीमात्रांना खाऊ-पिऊ घालण्याचा भावनिक मुद्दा सध्या देशात चांगलाच चर्चेत आहे. एकीकडे मुंबईतील जैन धर्मिय कबूतरांना दाणापाणी घालण्यासाठी इरेला पेटलेले असताना तिकडे राजधानी दिल्लीत भटक्या कुत्र्यांनी अक्षरशः थैमान घातले आहे. या सर्व गल्लीबोळातील भटक्या कुत्र्यांना पकडून जेरबंद करण्याचा अत्यंत महत्त्वाचा निकाल सर्वोच्च न्यायालयानं दिला होता. या निकालामुळं भटक्या कुत्र्यांच्या दहशतीनं त्रस्त सर्वसामान्य दिल्लीकरांना मोठा दिलासा मिळाला होता. परंतु न्यायालयाचा हा निकाल दिवसरात्र आपल्या मांडीवर कुत्री खेळवर्णाया उच्चभ्रू श्वानप्रेमींना पटला नव्हता.

भटक्या कुत्र्यांचा कळवळा येर्णायांच्या आर्जवाची दखल खुद्द सरन्यायाधीशांना घ्यावी लागली. अखेर भटक्या कुत्र्यांच्या ज्वलंत विषयावर नव्याने विशेष खंडपीठ स्थापन करण्यात आले. या खंडपीठाने नुकताच आपला निकाल दिला. भटक्या कुत्र्यांची नसबंदी करून त्यांना पुन्हा आहे त्याच जागी सोडण्याचा खंडपीठाने दिलेला निकाल श्वानप्रेमींच्या आनंदात भर टाकणारा असला तरी, सर्वसामान्यांची पुरती निराशा करणारच आहे. विशेष म्हणजे हा निकाल सर्वच राज्यांना लागू असणार आहे.

हे प्रकरण दिल्लीतील भटक्या कुत्र्यांच्या संदर्भात असले, तरी त्याची व्याप्ती मोठी आहे. कारण देशातील सर्वच राज्यांमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत पसरलेली आहे. महापालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा व इतर स्थानिक प्राधिकरणे भटक्या कुत्र्यांच्या संख्येला लगाम घालण्यात पुरती अपयशी ठरली आहेत. नव्वदच्या दशकांत स्थानिक प्राधिकरणांकडून भटक्या कुत्र्या-मांजरांना पकडून त्यांची नसबंदी केली जायची. त्यामुळे त्यांची संख्या आटोक्यात होती. परंतु मनेका गांधी यांना रोलमॉडेल मानत असलेले अनेक श्वानप्रेमी व त्यांच्या स्वयंसेवी संघटनांनी मागील काही वर्षांमध्ये भूतदयेच्या नावाखाली वेगवेगळ्या न्यायालयात खटले दाखल केले. मुक्या कुत्र्या-मांजरांना अनामुषपणे पकडून त्यांच्यावर स्थानिक प्राधिकरणांकडून अन्याय होत असल्याचे दावे या याचिकांमधून करण्यात आले. परिणामी राज्य सरकारच्या निधीवर सुरू असलेल्या या नसबंदीच्या प्रक्रियेत अडचणी निर्माण होत गेल्या, निर्बिजिकरण केंद्रांची संख्या घटत गेली व दुसरीकडे रस्त्यांवर कुत्र्या-मांजरांची संख्या वाढत गेली. कधीकाळी कोल्हा, लांडग्याच्या संकरातून नवा जन्म घेत मानवी वस्तीत स्थिरावरलेला, माणसानेच टाकलेल्या भाकरीवर वाढलेला कुत्रा रात्रीच्या अंधारात दात खाऊन माणसाच्या अंगावर धावून येऊ लागला आहे. देशातल्या प्रत्येक शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात, गल्लीबोळात मागच्या काही वर्षांमध्ये कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी तयार झाल्यात. काही झुंडी कर्चयावर पोसल्यात तर, काही झुंडी श्वानप्रेमींनी टाकलेले दूध-भात, बिस्किटे आणि कोंबड्यांच्या कच्च्या मांसावर धष्टपुष्ट झाल्यात. या झुंडींना रस्त्यावरुन, गल्लीतून जार्णाया लहान उंचीच्या एकट्या मुलात आता भक्ष्य दिसू लागले आहे. लहान मुलांचा माग काढत त्यांच्यावर एकत्र येऊन जीवघेणा हल्ला करणे, लचके तोडण्यात आल्याचे अनेक व्हिडीओ तुम्ही-आम्ही बघितले असतील. ही सगळी दृश्ये, घडर्णाया घटना अत्यंत भयावह आहेत.

कुत्र्या-मांजराचे निर्बिजीकरण थांबल्याचा हा परिणाम आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणावर भर दिला आहे. हा अत्यंत चांगला निर्णय आहे, परंतु या कुत्र्यांना निर्बिजीकरणानंतर पुन्हा आहे त्याच ठिकाणी सोडण्याचा निर्णय धोकादायकच म्हणावा लागेल. शिवाय कुत्र्यांना रस्त्यावर अन्नपाणी घालण्यास न्यायालयाने मज्जाव केला असला, तरी त्यासाठी फिडींग झोन तयार करण्याचा मुद्दाही वादाचाच म्हणावा लागेल. रेबिज झालेले कुत्रे व आक्रमक कुत्र्यांना शेल्टर होममध्ये ठेवले जाईल. परंतु आक्रमक कुत्रे म्हणजे काय? याची व्याख्या न्यायालयाने स्पष्ट केलेली नाही. दिवसभर वाहनांखाली, इमारतीच्या सावलीत शेपूट पाठीमागे घालून निवांतपणे झोपलेले हे कुत्रे रात्रीच्या अंधारात दानवी रुप धारण करतात.

एरियातील एका एका भिडूला सोबतीला घेत या झुंडी कुठे वाहनांच्या मागे धावतात, तर कुठे लहानमोठ्यांच्या अंगावर धावून त्यांच्यावर हल्ला करतात, अगदी काहीच नाही तर वाहनांच्या सीट फाडण्याचे उद्योगही करतच असतात, यापैकी कुठल्या कुत्र्यांना पकडून स्थानिक प्राधिकरणे शेल्टर होममध्ये नेऊन टाकणार हे यामुळे स्पष्ट होत नाही. कारण तसे करायचे म्हटल्यास या श्रेणीत 90 ते 95 टक्क्यांपेक्षा जास्त भटके कुत्रे येतातच येतात. शिवाय रेबिज होऊन पिसाळलेल्या कुत्र्यांना शोधून काढत त्यांना पकडणे हेदेखील स्थानिक प्रशासनापुढे आव्हान असेल. असो. न्यायालयाने आपलाच निर्णय फिरवला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयापुढे आता कुणीही जाऊ शकणार नाही, हेदेखील वास्तव आहे.

न्यायालयाच्या निर्णयानुसार आता राज्य सरकारांनी व स्थानिक प्राधिकरणांनी कुत्रे पकडून त्यांचे निर्बिजीकरण करण्याची मोहीम गांभीयार्ने हाती घेण्याची आत्यांतिक गरज आहे. निर्बिजीकरणाची केंद्र वाढवून, मनुष्यबळ पुरवण्यासाठी निधीची उपलब्धता होणेही गरजेचे आहे. या निर्बिजीकरणानंतर रस्त्यावरील भटक्या कुत्र्यांची संख्या आणि ते झुंडीने अंगावर धावून येण्याची मूळ समस्या काही एकाएकी कमी होणार नाही. निर्बिजीकरण मोहीम सुरू होऊन कुत्र्यांची संख्या नियंणत्रात येण्यासाठी काही वर्षांचा कालावधी जावा लागेल. तोपर्यंत रस्त्यावरुन रात्री पायी घरी चालत जार्णाया सर्वसामान्यांना कुत्र्यांच्या दहशतीमुळे जीव मुठीत घेऊन घर गाठावे लागणार आहे.

आणखी एक शस्त्र?

विरोधकांनी जोरदार मागणी केली, जनक्षोभ वाढला तरच नैतिकतेचा आव आणत राजीनाम्याचे पाऊल उचलले जाते. मोदी सरकारने १३०व्या घटनादुरुस्तीचे जे विधेयक आणले आहे, त्याकडे या पार्श्वभूमीतून पाहणे गरजेचे आहे. एखाद्या गंभीर गुन्ह्याच्या प्रकरणी अटक झाल्यास स्वतःहून आपले पद, मग ते पंतप्रधानपद असो, मुख्यमंत्रिपद असो की मंत्रिपद, सोडणे ही झाली नैतिकता; परंतु राजकारणात असे होईलच याची खात्री नाही. याला कारणे अनेक. एक तर गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत आरोपींना निर्दोष मानण्याची तरतूद कायद्यात आहे. दुसरे म्हणजे कमालीच्या स्पर्धात्मक झालेल्या राजकारणात आपला सत्तामार्ग सोपा करण्यासाठी विरोधकांना अशा गुन्ह्यांत गोवले जाऊ शकते; त्यामुळे अशा प्रकरणांना राजकीय कुरघोडीचे स्वरूप येते आणि मग आपण स्वतःहून पायउतार का व्हावे, असा प्रश्न आरोपी उपस्थित करू शकतात. तिसरा मुद्दा आहे, तो आपल्या ताब्यातील तपास यंत्रणांद्वारे सत्ताधारी त्यांना नको असलेल्यांना एखाद्या गुन्ह्यांमध्ये अडकावण्याची. शेवटचा मुद्दा म्हणजे आपल्याकडील गुन्ह्यांच्या तपासाच्या गतीचा. अटक करण्यापासून न्यायालयात खटल्याचा निकाल लागण्यापर्यंतचा कालावधी कितीही काळ लांबू शकतो. तोपर्यंत आरोपी हा निव्वळ आरोपी असतो; गुन्हेगार नाही. अशा सर्व कारणांमुळे कोणत्याही मंत्र्यांवर गुन्हेगारीचा आरोप झाला, की तो सहजासहजी पायउतार होत नाही. कार्यपालिका आणि न्यायपालिका या लोकशाही दोन स्तंभांतील अधिकारांचा मुद्दाही या विधेयकामुळे ऐरणीवर आला आहे. कायदा करणे हे कार्यपालिकेचे म्हणजे सरकारचे काम; तर या कायद्यांनुसार एखादा आरोपी दोषी आहे किंवा कसे हे ठरविणे हे न्यायालयांचे काम. मात्र, या विधेयकामुळे न्यायालयाच्या अधिकारात सरकारचा अधिक्षेप होण्याची शक्यता आहे; कारण सत्तेतील व्यक्तीवर गुन्हेगारीचा आरोप झाला आणि त्यासाठी तीस दिवसांची कोठडी झाली, तर तिला पदावरून हटावे लागेल. संबंधित व्यक्ती दोषी आहे की निर्दोष, याचा न्यायालयात निवाडा न होताही तिला पद गमवावे लागेल. संबंधित व्यक्ती कोठडीतून बाहेर आल्यानंतर ती त्या पदावर परत जाऊ शकते, असे हे विधेयक म्हणत असले, तरी न्यायदानाच्या प्रक्रियेला होत असलेला विलंब पाहता तिला आधीच पद सोडण्याची शिक्षा भोगावी लागेल, असे दिसते. थोडक्यात, अशा प्रकरणात नैसर्गिक न्यायाचे तत्त्व नाकारले जाते. वास्तविक, गुन्हा सिद्ध झालेल्या लोकप्रतिनिधींच्या शिक्षेची वेगळी तरतूद असताना हे स्वतंत्र विधेयक आणण्याची गरजच नाही. तरीही ते आणले गेले आहे. त्यामुळे त्यामागे राजकारण नाहीच, असे म्हणता येत नाही. हे विधेयक सादर करताना विरोधकांनी त्याच्या प्रती फाडून केलेला गोंधळ स्वीकारार्ह नसला, तरी त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न आणि आक्षेप महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे या विधेयकाची छाननीसाठी संयुक्त संसदीय समितीकडे झालेली रवानगी योग्यच म्हणावी लागेल. राज्यघटनेच्या अनुषंगाने या विधेयकावर रास्त प्रश्न उपस्थित होत असतानाच, त्याच्या संभाव्य वापराबाबतही प्रश्न आहेत. विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाल्यास त्याचा वापर ह्यस्वच्छह्ण आणि ह्यनैतिकह्ण कारणांसाठी होईल, हे खात्रीने सांगता येणार नाही. अंमलबजावणी संचालनालय (ईडी), केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) यांसारख्या यंत्रणांद्वारे विरोधकांना लक्ष्य करण्याचे सरकारचे आजवरचे वर्तन पाहता नव्या घटनादुरुस्तीचा उपयोग याच पद्धतीने होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विरोधकांची सरकारे असलेल्या राज्यांतील मंत्र्यांवर गंभीर आरोप करणे, त्यांच्या विरोधात केंद्रीय यंत्रणांकडून तपास करणे या गोष्टी काही नवीन नाहीत.

ज्याला गुन्हेगार म्हटले आहे, ते विरोधी नेते आपल्या पक्षात आल्यानंतर त्यांना ह्यपावनह्ण करून घेण्याचे प्रकारही सवयीचे झाले आहेत.

कालच्या विरोधकांबरोबर आज सत्ता उपभोगण्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. अशा गोष्टी वारंवार होत असून, त्यांची गल्लीपासून दिल्लीपर्यंतची किती तरी उदाहरणे सहज देता येतील. राजकारणात हे होतच असते, असे म्हणून सारवासारव केली जात असली, तरी सत्तेसाठी सरकारी यंत्रणांचा गैरवापर करण्यात कोणतीही नैतिकता नाही. या पार्श्वभूमीवर १३०व्या घटनादुरुस्तीच्या विधेयकावर आक्षेपांना सरकारने उत्तरे द्यायला हवीत. मुळात हे विधेयक गरजेचे आहे काय, याचाही फेरविचार करायला हावा. संयुक्त संसदीय समितीत या सा[]यांचा ऊहापोह होईल, अशी अपेक्षा आहे.
संपाज

अपयशातून यश मिळवणाऱ्यांचा प्रेरणादायी प्रवास

१८ ऑगस्ट हा दिवस जगभरात ह्यनेव्हर गिव्ह अप डेह्ण म्हणजेच कधीही हार न मानण्याचा दिवस म्हणून साजरा केला जातो. मानवी जीवनात अपयश, अडथळे, संघर्ष हे नेहमीच आले आहेत; पण त्यावर मात करून यश संपादन करणाऱ्यांची कहाणीच मानवजातीसाठी प्रेरणेचा खरा स्त्रोत ठरली आहे. प्राचीन काळातील प्रेरणा प्रेरणेची संकल्पना ही आधुनिक काळाची देणगी नाही. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो याने चौथ्या शतकातच मानवी इच्छाशक्तीचे महत्त्व स्पष्ट केले होते. त्याने म्हटले होते ह्यतर्क डोक्यात असतो, धैर्य छातीत असते आणि भूक पोटात असते.ह्ण याचा अर्थ असा की मानवी प्रेरणा ही शरीराच्या इच्छा, सुख-दुःख आणि धैर्यावर आधारित असते. त्यानंतरच्या पुनर्जागरण काळात रेने डेकार्टेसने प्रेरणेला सक्रिय आणि निष्क्रिय घटकांत विभागले. त्याच्या मते, इच्छाशक्ती हीच प्रेरणेची खरी शक्ती आहे. संघर्ष आणि न डगमगणारी जिद्द मानवाच्या या इच्छाशक्तीचे अनेक प्रेरणादायी उदाहरणे आपल्याला इतिहासात आणि वर्तमानकाळात दिसतात. १९९२ मध्ये झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत ब्रिटनचा धावपटू डेरेक रेमंड्स याने ४०० मीटर शर्यतीत मध्यावर हॅमस्ट्रिंग फाडून घेतले. असह्य वेदना असूनही तो उभा राहिला आणि आपल्या वडिलांच्या साथीने अंतिम रेषेपर्यंत धावत गेला. शर्यत जिंकली नसली तरी, त्याची जिद्द जगभरातील कोट्यवधी लोकांच्या मनात कायमची कोरली गेली. हॉलिवूडमधील अभिनेता सिल्वेस्टर स्टॅलोन याची कहाणीही याच दृढनिश्चयाची साक्ष देते. संघर्षमय आयुष्यात ह्यरॉकीह्ण ही पटकथा लिहिल्यानंतर त्याला दिग्दर्शक मिळाले, पण त्याला नायक म्हणून कुणी संधी द्यायला तयार नव्हते. लाखो रुपयांच्या ऑफर नाकारून त्याने आपल्या भूमिकेवर ठाम राहणे पसंत केले. अखेर त्यालाच मुख्य भूमिकेत घेतले गेले आणि ह्यरॉकीह्ण चित्रपटाने १९७६ मध्ये ऑस्कर जिंकले. ही केवळ कला नव्हती, तर संघषार्तून मिळालेल्या विजयाची कहाणी होती.

Public Notice

This is to inform the general public that the following agricultural land located at Mouje Nihe, Group Gram Panchayat Nihegaon, Nagzhari (Boisar), Taluka and Panchayat Samiti, Zilla Parishad Palghar, District Palghar, owned by:1) Mrs. Rupali Ganesh Sankhe, Residing at: Flat No. A-301, Tarangan Co-operative Housing Society Ltd., Phase 2, Virar (East), Taluka Vasai, District Palghar, 401402,is intended to be purchased by our clients:1) Mr. Deepak Moreshwar Naik and 2) Mrs. Preeti Deepak Naik, Residing at: Guruprasad Bungalow, Old Golden Nest Phase 3, Row House No. 3, Near Queen Mary School, Mira-Bhayander Road, Mira Road, Taluka & District Thane, 401107.

Details of the property are as follows –

Village	Survey No.	Sub-Division No.	Area (Hectare.Ares)
Nihe	83	12	47.962 (Approx. 47 Gunthas)

The sale transaction of the aforementioned land is about to be finalized shortly. If any person has any right, claim, or interest in the said land in any form such as purchase-sale, agreement, sale deed, mortgage, possession, maintenance rights, gift, donation, lien, lease, exchange, easement, or any other kind of legal interest or encumbrance, they are hereby requested to submit their written objections along with proper documentary proof to the undersigned (advocate of the buyers) at the address mentioned below within 14 (fourteen) days from the date of publication of this notice.

If no objections are received within the stipulated period, it will be presumed that no one has any objection, and the proposed sale transaction shall be considered to have been completed without any encumbrance. Any objections received after the due date shall not be binding on our clients. The general public is requested to take note of this.

Date: 25/08/2025

Signed:
Advocate Sanjit Tarakant Mishra
(Purchaser Advocate)
Mobile: 8692011110

Office Address:
Shop No. 14, Sonag Ganga Co-op Housing Society,
Near Golden Nest Bus Stop, Mira-Bhayandar Road,
Mira Road (East), District Thane 401107

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, २६ ऑगस्ट ते ०१ सप्टेंबर २०२५

एमआयडीसीला उच्च न्यायालयाचा दिलासा, निर्णयात हस्तक्षेपास नकार



मुंबई

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) केलेल्या जमीन वाटपाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला आहे, निर्णय प्रामाणिकपणे आणि सार्वजनिक हेतूने घेण्यात आला असेल तर सार्वजनिक जाहिरात किंवा व्यापक प्रसिद्धी न देणे हे अशा वाटपांना अवैध ठरवण्यासाठी पुरेसा आधार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. भ्रष्टचार निर्मूलन संघटनेने वकील उदय वारूंजीकर यांच्यामार्फत दाखल केलेल्या जनहित याचिकेवर निर्णय देताना मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने उपरोक्त बाब स्पष्ट केली. एमआयडीसीच्या भूखंडांचे आमदार आणि मंत्र्यांशी संबंधित व्यक्तींना योग्य प्रक्रिया न करता आणि सवलतीच्या दरात वाटप करण्यात आल्याचा दावा याचिकेत करण्यात आला होता. सर्व पात्र व्यक्तींना संधी दिल्याशिवाय सार्वजनिक भूखंडांचे वाटप करता येत नाही आणि एमआयडीसीने सार्वजनिक सूचना काढून अर्ज मागवणे अनिवार्य आहे. तथापि, राजकारणी आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या खासगी विनंत्या स्वीकारून भूखंडांचे वाटप करण्यात आले. परिणामी, भूखंड वापरण्याच्या हक्कांपासून अनेकजण वंचित राहिले, असा आरोपही याचिकेत करण्यात आला होता. दुसरीकडे, हे वाटप एमआयडीसीच्या संबंधित कायद्यानुसार करण्यात आले होते. या कायद्यातील तरतुदीनुसार, सार्वजनिक लिलावाद्वारे किंवा थेट अर्जांद्वारे वाटप करण्याची परवानगी आहे, असा दावा एमआयडीसीच्या वतीने करण्यात आला होता. या तरतुदीनुसार, औद्योगिक क्षेत्राचा पाच टक्के हा भाग शाळा आणि महाविद्यालयांसारख्या सुविधांसाठी राखीव ठेवणे अनिवार्य आहे. त्यानुसार, संबंधित भूखंडांचे वाटप हे विहित पाच टक्के राखीव कोट्यातून सार्वजनिक सुविधांसाठी केले जाते, असा दावाही एमआयडीसीतर्फे केला गेला. तसेच, २००४ च्या मंडळाच्या ठरावात शैक्षणिक संस्थांसाठी औद्योगिक दराच्या ५० टक्के सवलतीचे दर निश्चित करण्यात आले होते, असेही एमआयडीसीतर्फे न्यायालयाला सांगितले गेले. न्यायालयाने निकाल देताना एमआयडीसी दावा योग्य ठरवला व निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. याचिकाकर्त्यांनी जमीन वाटपाशी संबंधित तरतुदींना किंवा मंडळाच्या त्याबाबतच्या ठरावांना आव्हान दिलेले नाही. तसेच, संबंधित भूखंड हे शैक्षणिक उद्देशांसाठी वापरले जात होते. त्यामुळे, संबंधित संस्थांनी वाटप झालेल्या भूखंडांवर शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत यात कोणताही वाद नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर एमआयडीसीने लिलाव प्रक्रिया राबविली नाही म्हणून या शैक्षणिक संस्थांकडून भूखंड परत घेण्याचे आदेश देण्यासाठी खूप उशीर झाला आहे, असे न्यायालयाने आदेशात म्हटले. त्याचवेळी, संबंधितांकडून जमिनीच्या वापर अन्य कारणांसाठी केला जात असल्याचे एमआयडीसीला आढळल्यास वाटपधारकांवर कारवाई सुरू करावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

'तीन वर्षे मुदतवाढ देण्याचा महारेराला अधिकार नाही'; अपीलेट प्राधिकरणाचा दणका

मुंबई

पनवेल येथील गृहप्रकल्पाला सरसकट तीन वर्षे मुदतवाढ देण्याचा महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाचा (महारेरा) निर्णय अपीलेट प्राधिकरणाने रद्द केला असून सदनिकाधारकाला भरलेल्या रकमेवर संबंधित काळासह आतापर्यंत व्याज देण्याचे आदेश दिले आहेत. विक्री करारनाम्यातील अटी व शर्ती बदलून तीन वर्षे मुदतवाढ देण्याचा महारेराला अधिकार नाही, असा निर्णय देत अपीलेट प्राधिकरणाने महारेराला दणका दिला आहे. क्लॅन टॉवर या १७०० सदनिकांच्या गृहप्रकल्पाला मे २०१३ मध्ये सुरुवात झाली. नीतीन व नेहा वालावलकर यांनी या गृहप्रकल्पात सदनिका आरक्षित करुन सदनिकेच्या रकमेपोटी ३५ लाख रुपयांपैकी ३२ लाख ११ हजार ७७९ अदा केले होते. या प्रकल्पाची ताबा तारिख ३१ डिसेंबर २०१७ होती. त्यानंतर ताब्याची नवी तारिख ३० मार्च २०२३ अशी देण्यात आली. तोपर्यंतही ताबा न मिळाल्याने तसेच भरलेल्या रकमेवर व्याज मिळावे, यासाठी वालावलकर यांनी ॲड. गॉडफ्रे पिमेंटा यांच्यामार्फत महारेरात अर्ज केला. याबाबत सुनावणीच्या वेळी या प्रकल्पाला स्थानिक प्राधिकरणांमुळे विलंब झाल्याचा दावा विकासक सुप्रीम कन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपर्स यांनी केला. या विलंबाची घरखरेदीदारालाही कल्पना होती. त्यामुळे भरलेल्या रकमेवर व्याज देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही, असा युक्तिवाद विकासकाच्या वतीने करण्यात आला. विलंबाच्या कारणांमुळे आपल्याला तीन वर्षे मुदतवाढ मंजूर करावी, अशी विनंतीही केली.

घरखरेदीदारासोबत महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅट कायद्यानुसार (मोफा) विक्री करारनामा झाल्याने रेरा कायद्यातील तरतुदी लागू होत नाही, असाही युक्तिवाद करण्यात आला. महारेराने अखेर मुदतवाढीची विनंती मान्य करीत या गृहप्रकल्पाला ३१.१२.२०२० पर्यंत मुदतवाढ दिली. त्यानंतर म्हणजे १ जानेवारी २०२१ पासून घरखरेदीदाराला व्याज देण्यात यावे, असे आदेश दिले. या आदेशाला वालावलकर यांनी अपीलेट प्राधिकरणाकडे आव्हान दिले. आपल्याला १ जानेवारी २०१८ पासून भरलेल्या रकमेवर व्याज मिळाले पाहिजे, अशी आग्रही मागणी केली. ही मागणी अपीलेट प्राधिकरणाने मान्य केली आहे. मोफा कायद्यानुसार करारनामा झाल्याने रेरा कायद्यातील तरतुदी लागू होत नाही, हा महारेराचा मुद्दा खोडून काढताना अपीलेट प्राधिकरणाने सर्वोच्च न्यायालयातील एका निकालाचा हवाला दिला. सदर गृहप्रकल्प पूर्ण झालेला नसल्याने रेरा कायदा पूर्वलक्षी प्रकल्पांनाही लागू आहे, असे अपीलेट प्राधिकरणाने स्पष्ट केले. तसेच प्रकल्पाच्या विलंबाची जी कारणे दिली आहेत, तीही अमान्य करीत महारेरा तीन वर्षे मुदतवाढ देऊन करारनाम्यातील अटी व शर्ती बदलू शकत नाही, असे स्पष्ट केले. घरखरेदीदाराला भरलेल्या रकमेवर १ जानेवारी २०१८ पासून व्याज देण्याचे आदेश अपीलेट प्राधिकरणाने दिले आहेत.

गोरेगाव स्थानकात महिला तिकिट तपासनीसावर हल्ला



मुंबई

गोरेगाव स्थानकात एका महिला तिकिट तपासनीसावर महिला प्रवाशाने हल्ला केला. बोरिवली रेल्वे पोलिसांनी आरोपी महिला प्रवाशाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. अंधेरी (पूर्व) परिसरात वास्तव्यास असलेल्या तक्रारदार गीता पांडोरिया (५२) तिकीट तपासनीस आहेत. त्यांनी तिकीट तपासणीच्या कामासाठी त्यांनी बुधवार २० ऑगस्ट रोजी अंधेरीहून बोरिवलीला जाणारी धीमी लोकल पकडली.

अंधेरी स्थानकातून लोकल निघाल्यानंतर त्यांनी डब्यातील प्रवाशांचे तिकिट तपासण्यास सुरुवात केली. गीता पांडोरिया यांनी दुपारी ३.३० च्या सुमारास प्रवासी सोनी चौहान (२६) यांना तिकीट दाखवण्यास सांगितले. मात्र चौहानकडे तिकीट नव्हते. तिने दंड भरायलाही नकार दिला आणि हुज्जत घालायला सुरवात केली. त्यामुळे पांडोरिया यांनी तिला गोरेगाव स्थानकात उतरवून तिकीट तपासनीसांच्या कार्यालयात नेले. गोरेगाव स्थानकातील तिकिट तपासनीसांच्या कार्यालयात पोहोचल्यावरही सोनी वाद घालत शिवीगाळ करीत होती. यावेळी तिने गीता पंडेरिया यांना धमकीही दिली. उभयतांमध्ये वाद सुरू असताना अचानक तिने पांडोरिया यांच्यावर हल्ला केला. यात पांडोरिया यांच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटाला दुखापत झाली. सोनी चौहानने गोंधळ घालून सरकारी कार्यालयात अडथळा आणला. यावेळी अन्य कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करून चौहावर नियंत्रण मिळवले.

या प्रकरणी तिकीट तपासनीस गीता पंडारिया यांच्या तक्रारीवरून बोरिवली रेल्वे पोलिसांनी चौहानविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १३२ (शासकीय सेवकाला कर्तव्यापासून अडथळा आणणे), ११५ (२) (जखम करणे), ३५२ (जाणीवपूर्वक अपमान करून भांडण करणे) आणि ३५१ (गुन्हेगारी धमकी) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा दाखल करून पोलिसांनी चौहानला नोटीस बजावली. याप्रकरणी पुढील कारवाई सुरू आहे.

मद्यपी मुलाकडून वृद्ध आई-वडिलांना मारहाण; कारवाई न करणाऱ्या डोंबिवली पोलिसांवर कारवाई होणार



मुंबई , वृद्ध आईवडिलांना मद्यपी मुलाकडून निर्दयीपणे मारहाण केल्याप्रकरणी कारवाई करण्यात अपयशी ठरलेल्या डोंबिवली पोलिसांवर उच्च न्यायालयाने पुन्हा एकदा ताशेरे ओढले. तसेच, वृद्ध दाम्पत्याच्या मुलीने वारंवार तक्रार करून आणि मारहाणीचे पुरावे देऊनही त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या डोंबिवली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) प्रवीण रामचंद्र घुटुगडे आणि धनंजय चव्हाण यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे आदेश ठाणे पोलीस आयुक्तांना दिले. पोलिसांकडून काहीच कारवाई केली न गेल्याने वृद्ध दाम्पत्याच्या मोठ्या मुलीने उच्च न्यायालयात धाव घेऊन याचिका केली होती. या याचिकेची दखल घेऊन न्यायालयाने डोंबिवली पोलिसांच्या असंवेदनशील कृतीबाबत संताप व्यक्त केला होता. अत्याचार असह्य झाल्यानंतर आपण कुटुंबाच्या घरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेल्या चित्रिकरणात, तिचा मद्यपी भाऊ वृद्ध पालकांना रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाण करत असल्याचे दिसून आले. याचिकाकर्तीने हे चित्रीकरण सादर करूनही पोलिसांनी या प्रकरणी तक्रार नोंदवून गुन्हा दाखल केला नाही, अशा शब्दांत न्यायालयाने पोलिसांना मागील सुनावणीच्या वेळी फटकारले होते. तसेच, घुटुगडे यांच्याकडे शपथपत्रावर स्पष्टीकरण मागितले होते. न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणी सुनावणी झाली. त्यावेळी, पोलिसांनी या प्रकरणी दाखवलेल्या असंवेदनशीलतेवर संताप व्यक्त केला. पोलिसांची कृती धक्कादायक असल्याचे ताशेरेही न्यायालयाने ओढले. तसेच, घुटुगडे आणि चव्हाण या दोन अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याचे आदेश ठाणे पोलीस आयुक्तांना दिले. दरम्यान, याचिकाकर्तीने १६ जून २०२५ रोजी डोंबिवली पोलिसांकडे धाव घेतली. घुटुगडे यांनी तिची लेखी तक्रार स्वीकारण्यास नकार दिल्याचा आरोप होता, तेव्हा तिने आपली तक्रार टपालाने पाठवली, तथापि या प्रकरणी कोणताही गुन्हा नोंदवण्यात आला नाही. त्याऐवजी, घुटुगडे यांनी अदखलपात्र तक्रार नोंदवून घेतली.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./१३११/२५-२६

दिनांक :- २२/०८/२०२५

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	आचोळ-१४	NL२३/५३/१३	५१८१	सुलोचना बी. दास	आशिष भट्ट
२	आचोळ-१३	NL२२/३२/६	६०३६	ज्युलोयह ब्रिटो	रिहा योगेश मेहता
३	आचोळ-१३	NL२२/७६/२१०	६०३९	अनिलकुमार पी. यादव	अनिस गफ्फार मेमन व नसीम मेमन
४	आचोळ-१४	NL२३/१५०/३०	६३१४	मोईन त्रवादी	आयेशा रईस अहमद कुरेशी
५	आचोळ-११	NL२०/१५/२४	६३७२	गोपीलाल सुतार व रतनीदेवी सुतार	सोहनलाल देवराम चौधरी
६	आचोळ-११	NL२०/५९/२१/१	६४२६	जितेंद्रकुमार जनार्दन मिश्रा	चिंतामणी रामसमुझ दुबे
७	आचोळ-११	NL२०/८३/१३	६४१९	श्री विनायक बिल्डर्स	दर्शित परेश गिल्डर
८	आचोळ-११	NL२०/३४/६	६५५६	छाया यशेश शाह	सोनु सरेंद्र कनोजिया व सुनिता कनोजिया
९	आचोळ-११	NL२०/२५/४७	७३२६	प्रिती कंस्ट्र	भारती संजीवा राय
१०	आचोळ-१४	NL२३/६६/४२	६६३३	उज्या तल्बसुम मो. फईम	मो. हसिबुर रहमान
११	आचोळ-११	NL२०/४८/१	८०७०	अजितभाई रामजीभाई गोहिल	संजय कुमार मिश्रा
१२	आचोळ-११	NL२०/६०/२६	७८३१	विमल सावंत व संतोष सावंत	कविता एस सिंह व अनुराग सत्यप्रकाश सिंह
१३	आचोळ-१३	NL२२/८०/३०	८२२०	रशिद अहमद वारीस	आवडायनायगम शेंबागम पिल्ले
१४	आचोळ-१३	NL२२/१/६	७८३३	रामबहादुर आर गुप्ता/अर्चना गुप्ता	ईश्रवती देविश्याम नगिना सिंघ व श्याम रामब्रिकश सिंघ
१५	आचोळ-१४	NL२३/८७/६	७८३९	हकिमुद्दीन ए राजनगरवाला	नगमा बानो व इसरार खान
१६	आचोळ-१४	NL२३/१३४/४५	७८१८	दिलीप मांगीलाल गांधी	बिन्दु मदन रविदास प्रिया रविदास/निशा रविदास
१७	आचोळ-१४	NL२३/११४/२३	७२१३	मिणा रमणिक गोहिल	सुशिल बबनराव अरळकर
१८	आचोळ-१४	NL२३/४५/११	७३३१	राजेश गुप्ता व विवेक गुप्ता	विवेक राजेश गुप्ता
१९	आचोळ-१३	NL२२/६१/३	७१००	साई सिध्दी कंन्स्ट्र.	तिला महावीर बोहरा
२०	आचोळ-१३	NL२२/५२/३१	३८९७	पांडुरंग शिर्के	कविता राजेंद्र सिंग

XXX

(संगीता घाडीगांवकर)

सहायक आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com